नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०१६
बाबासोा विरुध्द प्रकाश व इतर
निशाणी क्र. ४० खाली

**अर्ज निशाणी क्र. ७८ वरील आदेशाप्रमाणे वादीतर्फे साक्षीदार क्र. १ बाबासो यांचा शपथेवर सरतपास अॅड. श्रीमती प्राजक्ता शिंदे यांच्या मार्फत**

१. मी माझे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ४० प्रमाणे दाखल केले आहे. सदर शपथपत्र माझे वकिल साहेब यांनी मी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार केले असून ते मला वाचून दाखविले. त्यातील मजकूर संपुर्णपणे बरोबर असून त्यावर मी माझ्या सहया केलेल्या आहेत.

२. कुंदा रामजी गुप्ता पुर्वाश्रमीची कुंदा बाबला मटकर उर्फ तेली यांनी माझ्या हक्कात लिहून ठेवलेले दिनांक १३/१०/२०१५ रोजीचे मुळ मृत्यूपत्र दाखल केले आहे. ते वस्तु अ प्रमाणे आहे. कुंदा बाबला मटकर उर्फ तेली यांचे मृत्यूप्रमाणपत्र निशाण क्र. ८० प्रमाणे आहे. कुंदा रामजी गुप्ता पुर्वाश्रमीची कुंदा बाबला मटकर उर्फ तेली यांनी माझ्या हक्कात करुन दिलेले साठेकरारपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही व अंगठयाचा ठसा आहे. तसेच त्यावर कुंदा रामजी गुप्ता यांच्या अगंठयाचा ठसा आहे. त्यावर मान्यता देणार म्हणून रामजी इपत गुप्ता व राजन रामजी गुप्ता यांच्या सहया व अंगठयाचे ठसे आहेत. तसेच त्यावर ओळख म्हणून बळवंत गणपती पाटील यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर मुळ साठेकरारपत्र निशाणी क्र. ८१ प्रमाणे आहे. कुंदा रामजी गुप्ता पुर्वाश्रमीची कुंदा बाबला मटकर उर्फ तेली यांनी माझ्या हक्कात करुन दिलेले कुलमुखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही व अंगठयाचा ठसा आहे. तसेच

त्यावर कुंदा रामजी गुप्ता यांच्या अगंठयाचा ठसा आहे. तसेच त्यावर ओळख म्हणून बळवंत गणपती पाटील यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर मुळ साठेकरारपत्र निशाणी क्र. ८२ प्रमाणे आहे.

सरतपास पुर्ण.

''माझे समक्ष''

(टी.एच. शेख)
न्यायाधीकारी,
ग्रामन्यायालय, वैभवाडी
दिनांकः ०८.०२.२०२३

श्रवणोत्तर स्वीकृत

(टी.एच. शेख)
न्यायाधीकारी,
ग्रामन्यायालय, वैभवाडी

**प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे तर्फे वादीचा उलट तपास विधिज्ञ श्री.यु.एस.सावंत यांचेमार्फत सुरु.**

३. माझे मुळ गाव पाटणे ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर हे आहे. माझे पाटणे या गावी घर व शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे माझे वंशावळीतील नसून माझे नातेवाईक अथवा संबंधीत नाहीत. मी बांधकामाचे काम व चालक म्हणून काम करतो. माझे शिक्षण ९ वी पर्यंत झाले असून ते सरुड ता. शाहूवाडी येथे झाले आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी, एक मुलगा व एक मुलगी आहे. आम्ही सर्वजण लोरे नं. २ मोगरवाडी येथे राहतो. लोरे नं. २ येथे माझे नावे घर असून त्याचा क्र. १०४ आहे. मी लोरे नं. २ येथे संतोष अनंत पाताडे यांचेकडून घर व घराखालील जमिन खरेदी केलेली आहे. माझा घर खरेदीचीचा व्यवहार संतोष व त्याची पत्नी श्रध्दा यांच्याशी झाला आहे. मी सदरचे घर सन २०१७ साली खरेदी केले आहे. सदर घराचे नोंदणीकृत खरेदीखत झालेले आहे. सदरचे खरेदीखत रक्कम रु. २३,००,०००/– रुपयांकरीता झालेले आहे. मी काही रक्कमेच्या मोबदल्याकरीता चेक दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर घर खरेदीच्या व्यवहाराबाबत साठेकरारपत्र नोटरी पब्लीक श्री.राजेंद्र रावराणे यांचेकडे करण्यात आले होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, घर व जमिनीचे मुळ मालक श्रध्दा संतोष पाताडे यांनी कणकवली येथील न्यायालयात माझे विरुध्द संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १३८/२०१८ हे प्रकरण खरेदी व्यवहारापोटी दिलेल्या धनादेशाचे अनादरण झाल्याचे आरोप करुन दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. सदरचे प्रकरण तडजोडीने निकाली काढण्यात आलेले आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी कथित मृत्यूपत्राच्या आधारे दावा मिळकतींमधील कुंदा यांच्या स्वतंत्र हिश्श्याची मागणी करण्याकरीता दावा दाखल केला आहे. मला दावा मिळकतींची स्थानिक नावे सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. ५ ते १५, १७ ते १९, २४ ते २६, २८ १ ते २८ ६, २९ ते ३२ व ४४ यांच्याविरुध्द खारीज करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. ३७ यांचेविरुध्द अवसान पावला आहे. दावा खारीज झालेल्या पक्षकारांविरुध्द मी नवीन दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा खारीज झालेल्या आदेश बाजूला

सारण्यात यावा याबाबत अर्ज दिलेला नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ चे वडील शिवराम यांना प्रतिवादी क्र.. १ यांचेशिवाय शोभा, उषा, रजनी व कल्पना या मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ची आई म्हणजे शिवराम यांची पत्नी चंद्रभागा ही हयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा गुप्ता हिला राजन रामजी गुप्ता हा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, राजन रामजी गुप्ता हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा हिचा पती रामजी गुप्ता हा हयात आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा हिचे पती रामजी, मुलगा राजन यांना मी पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र. १ प्रकाश यांच्या बहिणी व आई चंद्रभागा यांना पक्षकार केलेले नाही.

७. मी लोरे नं. २ येथील मधुकर गोविंद कांबळे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर गोविंद कांबळे याने माझ्या लोरे येथील जमिनीसंदर्भात कणकवली येथील न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ३९/२०१८ दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याने त्या दाव्यामध्ये माझेविरुध्द कायम मनाईचा आदेश मागितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लोरे नं. २ येथील ज्या जमिनीबद्दल मी मालकी हक्क सांगितलेला आहे त्याच जमिनीबद्दल मधुकर गोविंद कांबळे यांने सुध्दा मालकी हक्क सांगितलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित आहे.

८. दि. १३/१०/२०१५ रोजी मी कुंदा हिचेसोबत अॅड.राजेंद्र रावराणे यांच्या कणकवली येथील कार्यालयात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे व कुंदा हिचे दरम्यान दावा मिळकतीबाबत साठे करारपत्र करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे दरम्यान दावा मिळकतींची किंमत रु. १०,००,०००/– ठरविण्यात आली होती. त्यावेळी मी एकटाच होतो. मी बळवंत गणपती पाटील यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते मांडरे ता. करवीर जि. कोल्हापूर येथील माझ्या गावाकडील भागातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी दावा मिळकतीसंदर्भात अॅड. राजेंद्र रावराणे यांच्या कार्यालयात नि. क्र. ८२ चे कुलमुखत्यारपत्र तयार करण्यात आले होते. त्यावेळी कुंदा कणकवली येथे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या मृत्यूपत्राआधारे दावा केला आहे ते मृत्यूपत्रसुध्दा दिनांक १३/१०/२०१५ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे मृत्यूपत्र दुय्यम निबंधक कार्यालय वैभववाडी यांचेकडे नोंदणीकृत केलेले आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, दादासो श्रीमती पाटील हे माझे भाऊ आहेत. आता मला माझे वादपत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, वाद पत्रात मुखत्यारपत्र व साठेकरारपत्र याबाबतचा मजकूर नमूद नाही. सदर मजकूर दाव्यात नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३/१०/२०१५ पासून २० दिवसांनी म्हणजेच ११/११/२०१५ रोजी कुंदा ही जिल्हा रुग्णालय ओरस येथे मयत झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा ही जिल्हा रुग्णालय ओरस येथे उपचार घेत होती. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिला उच्च रक्तदाब, अर्धांगवायूचा व उच्च मधुमेह हे आजार होते. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिचा पती रामजी हा सेंट्रींगची कामे करतो. माझे म्हणण्याप्रमाणे तो सुतारकाम करतो. हे म्हणणे खरे नाही की, रामजी हा मला माझे बांधकाम व्यवसायात मदत करीत होता. रामजी याला माझ्याकडे कामाला येण्याचा कधीही प्रसंग आलेला नाही.

१०. माझे वकीलसाहेबांना प्रस्तुत दाव्यातील माहिती मी स्वतः दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे वकीलसाहेबांना सांगितले होते की, रामजी हा माझेकडे मजुरीच्या कामाकरीता येत असे. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगितले आहे की, रामजी याला माझ्याकडे कामाला येण्याचा कधीही प्रसंग आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामजी माझेकडे कामाला येत असल्यामुळे आमचे दरम्यान आर्थिक संबंध निर्माण झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे व रामजी याचे दरम्यान कसलेही संबंध निर्माण झालेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा व रामजी तसेच त्यांचा मुलगा व नातवंडे हे एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, रामजी हा उत्तरप्रदेशातील आहे. कुंदा व रामजी यांचे दरम्यान कशी ओळख झाली व त्यांचे लग्न कुठे झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा अशिक्षित होती व ती अंगठयाचा ठसा करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, रामजी हा अशिक्षित आहे. हे म्हणणे खरे नाही की, रामजी याचा मुलगा राजन हा कोणत्याही शाळेत गेला नव्हता. कुंदा यांचा मुलगा राजन याची पत्नी कोठे राहते याची मला माहिती नाही.

प्रश्न – मृत्यूपत्रान्वये एखादयाला जमिनी देण्यात आल्यास त्याच जमिनीबद्दल मुखत्यारपत्र व साठेकरारपत्र करुन देण्याची आवश्यकता नाही हे बरोबर आहे काय \

उत्तर – मला कुलमुखत्यारपत्र व साठेकरारपत्र याबाबत माहिती आहे. त्यानंतर २० दिवसांनी मृत्यूपत्र कुंदा हिचा मुलगा राजन याने आणून दिले होते.

११. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिला दावा मिळकती मला मृत्यूपत्रान्वये देण्याची काहीही आवश्यता नव्हती. सध्या रामजी व राजन हे मुंबई येथे असतात. ते दोघे काय काम करतात याबद्दल मला माहिती नाही. त्यांच्याशी माझा मोबाईलव्दारे संपर्क नाही. मी साठेखतापुर्वी राजन याला वेळोवेळी काही रक्कमा दिल्या होत्या. मी त्याला वेळोवेळी रक्कम रु. ३०,०००/– दिले होते. मी त्याला रु. ५०,०००/– चा चेक दिला होता. सदरचा चेक स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा वैभववाडी येथील होता. मला चेक चा क्रमांक आठवत नाही. मी चेकवर नाव टाकले नव्हते. सदरचा चेक वटविण्यात आलेला आहे. सदरचा चेक कोणाच्या खात्यात वटविण्यात आला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा, रामजी अथवा राजन यांचे कोणत्याही बँकेत खाते नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी राजन याला चेक दिला नव्हता व तो वटविण्यात आला नव्हता. मी माझा बँकेतील खात्याचा खातेउतारा दाखल करु शकतो.

१२. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी प्रकाश व दिपक हे कुंदा हिचे सख्खे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा , दिपक व प्रकाश यांचे एकत्र कुटूंब आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुंदा व तिचे पती रामजी हे काही काळ मुंबई येथे कामाला होते. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा मुंबई येथे आजारी पडल्यामुळे त्यांचे कुटूंब गावी आले होते. ते सन २०१२ साली घर बांधण्याकरीता गावी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी कुंदा हिला गावात घर क्र. ५१२ बांधून दिले होते.

१३. मुखत्यारपत्र व साठेकरारपत्र नि.क्र. ८१ व ८२ हे राजन गुप्ता याने रावराणे वकीलसाहेबांकडे तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिने कधीही मृत्यूपत्र केलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व कुंदा हिच्या कुटूंबाच्या दरम्यान जिव्हाळयाचे संबंध होते, त्यांचे कुटूंब गरीब असल्यामुळे मी त्यांना मदत करीत होतो हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिने मला मानसपुत्र मानले होते हे मी खोटे सांगितले आहे. मी कुंदा हिला निश्चित किती मदत केली होती हे मला सांगता येणार नाही. मी तिला लहान मुलांच्या औषधपाण्याला, कुंदा हिच्या औषधपाण्याला व दैनंदिन खर्चासाठी मदत करीत होतो. मी तिला कधीही हजार कधी पाचशे अशी मदत करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे कुटूंब त्यामुळे माझे उपकारामध्ये होते. कुंदा हिच्या कुटूंबाच्या गरजा त्यांच्या उत्पन्नातून भागत नव्हत्या म्हणून मी त्यांना मदत करीत होतो किंवा कसे हे मला सागता येणार नाही. प्रत्येकवेळी ते माझेकडे मदत मागत होते. सदरची परतफेड कायमस्वरुपीची होती व परतफेड स्वरुपाची नव्हती.

१४. माझ्या व कुंदा हिच्या कुटूंबाचा संपर्क सन २०१३ पासून आलेला आहे. सन २०१३ पासून ते आजपर्यंत सुध्दा मी सदर कुटूंबाला मदत करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्रान्वये जमिनीचा मालक झालो आहे हे मी खोटे सांगितले आहे. मी कुंदा हिच्या कुटूंबाला केलेल्या मदतीबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कुंदा हिच्या अविभक्त मिळकतीमध्ये मला मृत्यूपत्रान्वये कोणताही स्वतंत्र हक्क प्राप्त होणारा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

''माझे समक्ष''

श्रवणोत्तर स्वीकृत

(टी.एच. शेख)
न्यायाधीकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी
दिनांकः १२/०३/२०२३

(टी.एच. शेख)
न्यायाधीकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी